Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

Original Article

# आखाती युद्धामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर पडणारे संभाव्य दुष्परिणाम

**Dr. Prashant M.Puranik**
Assistant professor in commerce
Gurukul Arts, Commerce & science college, Nanda, Ta. Korpana, District. Chandrapur 442917
Email ID : prashantpuranik1970@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180326
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 3(A)
Pp. 137-
March- 2026
**Submitted:** 15 Feb. 2026
**Revised:** 25 Feb. 2026
**Accepted:** 10 Mar. 2026
**Published:** 31 Mar. 2026

**गोषवारा:**

२८ फेब्रुवारी २०२६ रोजी, अमेरिका आणि इस्रायलने इराणमधील अनेक ठिकाणी आणि शहरांवर अचानक हवाई हल्ले केले, ज्यामध्ये इराणी सर्वोच्च नेते अली खामेनी आणि इतर इराणी अधिकारी ठार झाले ज्यामुळे तणाव मोठ्या प्रमाणावर वाढला असून, या संघर्षाचे परिणाम इंधनाच्या किमती आणि जागतिक व्यापारावर जाणवू लागले आहेत. इराणचे नेतृत्व आणि नेतृत्व क्षमता कमकुवत करणे हे या हल्ल्यामागील प्रमुख कारण होते. परंतु इराणने देखील अमेरिकेच्या या हल्ल्याला प्रत्युत्तर देताना मध्यपूर्वेतील अमेरिकन लष्करी तळ, इस्रायल आणि कुवेत, बहरीन, युएई, कतार यांसारख्या मित्रराष्ट्रांमधील तळांवर जोरदार प्रतिहल्ला (Counterattack) चढवला आहे. या हल्ल्यात बॅलिस्टिक आणि हायपरसॉनिक क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आला. भारताच्या अर्थव्यवस्थेवर मात्र या आखाती युद्धाचे दूरगामी परिणाम आतापासूनच अनुभवायला मिळत आहेत. भारताला स्वातंत्र्य प्राप्त होऊन अनेक दशके उलटली असली तरी भारतीय अर्थव्यवस्था मात्र अद्याप देखील स्वयं केंद्रित नाही. तर ही अर्थव्यवस्था अन्य देशांच्या अर्थव्यवस्थांवर अवलंबून आहे. दरम्यान इराणने बहरीनमधील सर्वात मोठ्या रिफायनरीला लक्ष्य केले आहे. कंपनीने सोमवारी जारी केलेल्या निवेदनानुसार रिफायनरी कॉम्प्लेक्सवर झालेल्या हल्ल्यामुळे काही ऑपरेशन प्रभावित झाले आहेत. या हल्ल्यानंतर बहरीनची सरकारी ऊर्जा कंपनी Bapco Energy ला इराणच्या हवाई हल्ल्यांपासून वाचवण्यासाठी बहरीनने तेथील सुरक्षा यंत्रणा अधिक प्रभावी केली आहे.

अमेरिका-इराण-इस्रायल (Gulf Crisis) संघर्षाचा होर्मुझ स्ट्रेट मार्गावर परिणाम झाल्याने भारताच्या एलपीजी (LPG) आयातीवर फटका बसला असून, गॅस सिलेंडरचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. महाराष्ट्रासह अनेक शहरांत व्यावसायिक गॅसच्या कमतरतेमुळे हॉटेल्स, धाबे संकटात सापडले आहेत, तर काही ठिकाणी सिलेंडरसाठी लांब रांगा लागल्या आहेत. सिलेंडरच्या तुटवड्यामुळे लग्नसराइच्या दिवसांमध्ये बहरत असलेल्या केटरिंग व्यवसायालासुद्धा मोठा धोका निर्माण झाला आहे. अनेक केटरिंग व्यावसायिकांनी सिलेंडरला पर्याय म्हणून आता चुलीवर स्वयंपाक करण्यास प्राथमिकता दिली आहे. भारत इराणला द्राक्ष, सफरचंद, अननस, संत्र, मोसंबी, आंबा, चिकू इत्यादी विविध फळे अनेक वर्षांपासून निर्यात करत आहे. आखाती युद्धामुळे ही निर्यात थांबली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आणि व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. वरील घटकांप्रमाणे अनेक घटक असे आहेत की ज्यामुळे आखाती युद्धाचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर अत्यंत खोलपर्यंत होऊ शकतो आणि ती कमकुवत होऊ शकते. हे संभाव्य घटक कोणते आहेत आणि त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर काय विपरीत परिणाम होणार आहेत? यावर सखोल विवेचन होणे अत्यंत आवश्यक आहे.

**बीज शब्द:** सामुद्रधुनी, कच्चा माल, निर्देशांक, टंचाई, सुसंगत.

**प्रस्तावना:**

पहिले आखाती युद्ध हे इराणच्या आखातामध्ये अमेरिकेची संयुक्त संस्थाने व तिच्या ३४ मित्र राष्ट्रांची आघाडी विरुद्ध इराक यांच्यात घडलेले युद्ध होते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*Dr. Prashant M.Puranik, Assistant professor in commerce, Gurukul Arts, Commerce & science college, Nanda, Ta. Korpana, District. Chandrapur*

**How to cite this article:**
*Puranik, P. M. (2026). आखाती युद्धामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर पडणारे संभाव्य दुष्परिणाम. Journal of Research & Development, 18(3(A)), 137–141.* https://doi.org/10.5281/zenodo.19638830

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.19638830
OPEN ACCESS

२ ऑगस्ट, इ.स. १९९० रोजी आरंभलेले हे युद्ध २८ फेब्रुवारी, इ.स. १९९१ रोजी संपले.२ ऑगस्ट, इ.स. १९९० रोजी इराकी सैन्याने कुवेतावर आक्रमण केले. इराकी आक्रमणाविरुद्ध आंतराष्ट्रीय समुदायाने तीव्र निषेध नोंदवला. संयुक्त राष्ट्रे सुरक्षा परिषदेच्या सदस्य देशांनी प्रत्युत्तरादाखल इराकावर आर्थिक निर्बंध लादले. तत्कालीन अमेरिकी राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एच.डब्ल्यू. बुश यांनी सौदी अरेबियात अमेरिकी फौजा उतरवून मित्र राष्ट्रांनाही फौजा धाडण्याचे आवाहन केले. अनेक मित्र राष्ट्रांच्या आघाडी सैन्यात अमेरिका, सौदी अरेबिया, युनायटेड किंग्डम व इजिप्त यांच्या सैन्यदलांचा प्रमुख सहभाग होता.

कुवेतात घुसलेल्या इराकी सैनिकांना पिटाळून लावायला १७ जानेवारी, इ.स. १९९१पासून हवाई बॉबहल्ले चालू झाले व त्यापाठोपाठ २३ फेब्रुवारीपासून जमिनीवरून हल्ले आरंभण्यात आले. या युद्धात आघाडी सैन्याने निर्णायक विजय मिळवत कुवेतातून इराकी सैन्यास पिटाळून तर लावलेच, शिवाय इराकी सीमेतही मुसंडी मारली. पहिले आखाती युद्ध इराकने कुवेतवर केलेल्या आक्रमणामुळे तर झाले होतेच पण याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे अमेरिकेने कुवेत मधील तेलसाठ्यांवर आणि तेथील रिफायनरीजवर ताबा मिळवण्यासाठी पहिल्या आखाती युद्धात इराक विरुद्ध आपली व मित्र राष्ट्रांची सेना कुवेतमध्ये पाठवली होती. अखेर इराकला त्यांचे सैन्य कुवेतमधून परत बोलवावे लागले होते.

सध्या सुरू असलेल्या आखाती युद्धामुळे सुरू असलेल्या संघर्षाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

जागतिक बाजारपेठेतील चढउतार, विस्कळीत झालेला ऊर्जा पुरवठा, रुपयाची घसरण आणि आर्थिक व्यवस्थेत निर्माण होणारी अनिश्चितता यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात दबाव वाढू शकतो.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

सध्या सुरू असलेल्या आखाती युद्धामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर कोणते संभाव्य परिणाम होऊ शकतात? हे जाणून घेण्यासाठी सदर संशोधन करण्यात आले आहे.

**गृहीतकृत्य:**

'आखाती युद्धाचे गंभीर दुष्परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होऊ शकतात व ती विस्कळीत होऊ शकते.'

**संशोधन आराखडा:**

या संशोधनाची महत्त्वाची माहिती गोळा करण्यासाठी द्वितीय स्त्रोतांची मदत घेतल्या गेली.

आखाती युद्धामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर पडणारे संभाव्य दुष्परिणाम:

भारताला आपल्या ऊर्जेच्या गरजांसाठी मोठ्या प्रमाणात आयातीवर अवलंबून राहावं लागतं. यातील मोठा भाग मध्य पूर्वेकडील देशांकडून येतो. त्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. मध्य पूर्वेतील देश भारतासाठी इतरही अनेक आवश्यक कच्च्या मालाचे मोठे पुरवठादार आहेत. त्यामुळे त्या भागात अडथळे निर्माण झाले, तर तेल-गॅसबरोबरच भारतातील अनेक उद्योगांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. प्रसारमाध्यमं आणि तज्ज्ञांच्या मते, ऊर्जा आयातीचा खर्च वाढल्यास भारताचा व्यापार तुटीचा (ट्रेड डेफिसिट) आकडा वाढू शकतो. त्याचबरोबर महागाईही वाढण्याची शक्यता आहे, असा इशारा प्रसारमाध्यमं आणि या क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जगातील एक पंचमांश तेलाचा पुरवठा होतो. हा मार्ग बंद झाला, तर भारतासह अनेक देशांना तेल मिळण्यास अडथळा येऊ शकतो. यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती झपाट्याने वाढू शकतात. त्याचा परिणाम भारतातील तेलाच्या किमतींवरही होण्याची शक्यता आहे.

भारताच्या द्रवरूप नैसर्गिक वायूच्या (एलएनजी) पुरवठ्याबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. कारण भारताला मिळणाऱ्या एलएनजीपैकी सुमारे 80 टक्के पुरवठा मध्य पूर्वेतील देशांकडून होतो. भारताला एलएनजी आणि इतर ऊर्जा उत्पादनांचा पुरवठा करणारी प्रमुख कंपनी कतार एनर्जीने इराणी ड्रोन हल्ल्यांनंतर आपल्या एका प्रकल्पातील उत्पादन थांबवलं आहे. त्याचवेळी होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे भारताकडे येणाऱ्या ऊर्जा पुरवठ्यालाही मोठा फटका बसला आहे.

10 मार्च रोजी केंद्र सरकारने एलपीजीची टंचाई होऊ नये म्हणून आपत्कालीन उपाययोजना लागू केल्या. मुंबई, बेंगळुरू आणि चेन्नईसह काही शहरांमध्ये गॅसचा पुरवठा कमी पडू लागल्याची स्थिती निर्माण झाली होती. काही ठिकाणी इंधनाचा पुरेसा साठा नसल्यामुळे रेस्टॉरंट बंद ठेवावे लागू शकतात, असा इशाराही देण्यात आला.

तेलाच्या वाढत्या किमतीचा दबाव हा सुद्धा भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रत्यक्ष आणि थेट परिणाम करणारा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कच्च्या तेलासाठी भारत मोठ्या प्रमाणावर इतर देशांवर अवलंबून आहे. त्यामुळे ऊर्जा खर्च हा देशाच्या आर्थिक स्थैर्यासाठी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

महत्त्वाचा घटक ठरतो. जागतिक बाजारात तेलाच्या किमती वाढल्याने भारतीय आर्थिक बाजारावरही त्याचा परिणाम झाला असून देशाची आर्थिक असुरक्षितता समोर आली आहे.

कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यामुळे 9 मार्च रोजी रुपया डॉलरच्या तुलनेत 92.33 या नव्या नीचांकी पातळीवर आला. याचाच परिणाम म्हणून सेन्सेक्स आणि निफ्टी हे प्रमुख शेअर बाजार निर्देशांकही जवळपास 3 टक्क्यांनी घसरले आणि सुमारे 11 महिन्यांतील त्यांच्या सर्वात नीचांकी पातळीवर पोहोचले. आखाती प्रदेशातून तेलाच्या पुरवठ्यात अडथळे आल्यामुळे ब्रेंट कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल 120 डॉलरपर्यंत वाढली. त्यामुळे अलीकडच्या काही दिवसांत भारताची आर्थिक असुरक्षितता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. कारण भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा कच्चे तेल आयात करणारा देश आहे. तेलाच्या किमती झपाट्याने वाढल्या की, आयातीवरचा खर्च वाढतो, महागाई वाढते, कंपन्यांच्या नफ्यावर दबाव येतो आणि चालू खात्याची तूटही वाढते.

आखाती युद्धामुळे भारतीय औद्योगीकरण सुद्धा मोठ्या प्रमाणात विस्कळीत होऊ शकते. भारत जास्तीत जास्त कच्चा माल विदेशातून खरेदी करत असल्यामुळे मात्र आखाती युद्धामुळे हा कच्चामाल भारताला मिळणे कठीण झाल्यामुळे, हे आखाती युद्ध दीर्घ काळ सुरू राहिल्यास भारतातील अनेक उद्योग बंद होऊ शकतात. परिणामतः बेरोजगारीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते.

आखातातील कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यास भारतातील वस्तूंच्या किमतीमध्ये वाढ होण्याची दाट शक्यता आहे. काही उद्योजक व व्यावसायिक कमी कालावधीमध्ये जास्तीत जास्त नफा प्राप्त करण्यासाठी मोठ्या प्रमाणात जीवनावश्यक वस्तूंचा खूप मोठा साठा करून बाजारपेठांमध्ये कृत्रिम टंचाई निर्माण करू शकतात. परिणामतः बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणात स्पर्धा निर्माण होऊन वस्तू ग्राहकाच्या माथी मारण्यास विक्रेते प्राथमिकता देतील.

आखाती युद्धाचा परिणाम भारतीय शेअर बाजारवर सुद्धा झालेला आहे. येत्या काही दशकांमध्ये विदेशी गुंतवणूकदार भारतीय शेअर बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत. परंतु आखाती युद्धामुळे ते आपला पैसा भारतातील शेअर बाजार मधून काढत आहेत. त्याचा परिणाम भारतीय शेअर बाजारावर झालेला असून तो गडगडला आहे. याच कारणामुळे भारतातील मोठ्या कंपन्यांचे शेअर्सच्या किमती मोठ्या प्रमाणात घसरल्या आहेत ज्याचा फटका भारतीय गुंतवणूकदारांवर देखील झालेला आहे. शेअर बाजार घसरल्यामुळे त्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. येत्या काही दिवसांमध्ये भारतीय शेअर बाजारामध्ये जो भूकंप झालेला आहे, त्यामुळे अनेक मोठ्या गुंतवणूकदारांना फार मोठे नुकसान सहन करावे लागले आहे. त्यातच काही दिवसांपूर्वी सोने आणि चांदी या धातूंच्या गगनाला भिडलेल्या किमती या देखील मोठ्या प्रमाणात घसरल्या आहेत. काही दिवसांपूर्वी सोने आणि चांदी या धातूंनी किमतीतील उच्चांक गाठला होता. केवळ दहा ते पंधरा दिवसात या धातूंच्या किमतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. परंतु त्यानंतर मात्र या धातूंच्या किमतीमध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झालेली आढळते. कमी वेळात जास्त परतावा मिळेल या उद्देशाने ज्या गुंतवणूकदारांनी सोने आणि चांदी या धातूंमध्ये गुंतवणूक केली होती, त्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे.

आखाती देशांत लाखो भारतीय कामगार आहेत. युद्धामुळे अनेक व्यवहार ठप्प झाल्याने या कामगारांच्या नोकऱ्यांवर गदा येण्याची आणि भारतात येणाऱ्या परकीय चलनात (remittances) घट होण्याची शक्यता आहे.

इराण-अमेरिका संघर्षामुळे आखाती प्रदेशात निर्माण झालेला तणाव भारतासाठी ऊर्जा सुरक्षा, आर्थिक स्थिरता आणि परराष्ट्र धोरण या तिन्ही आघाड्यांवर मोठा दबाव (Pressure) निर्माण करत आहे. या युद्धजन्य परिस्थितीमुळे अमेरिकेचा भारतावर असलेला दबाव प्रामुख्याने खालील प्रकारे दिसून येत आहे:

रशियन तेलावर निर्बंधांचा दबाव: अमेरिकेने भारताला रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी कमी करण्यासाठी किंवा थांबवण्यासाठी दबाव आणला आहे. इराण-इस्रायल संघर्षात आखाती पुरवठा विस्कळीत झाल्यामुळे भारताला रशिया हा स्वस्त तेलाचा उत्तम पर्याय वाटत असला, तरी अमेरिकन निर्बंधांमुळे भारताला ऊर्जा सुरक्षेसाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे।

व्यापार आणि इराण संबंधांवर दबाव: अमेरिकेच्या इराणविरोधी मोहिमेमुळे भारताच्या इराणशी असलेल्या संबंधांवर परिणाम झाला आहे. इराणकडून वारंवार येणाऱ्या दडपणामुळे किंवा अमेरिकेच्या निर्बंधांमुळे भारताला इराणमधील चाबहार बंदर प्रकल्प आणि व्यापारी संबंधांमध्ये सावध भूमिका घ्यावी लागत आहे। आर्थिक आणि पुरवठा साखळीवर परिणाम: आखाती युद्धामुळे कच्च्या तेलाचे भाव (प्रति बॅरल $100 च्या आसपास) वाढले आहेत, ज्याचा थेट फटका भारतीय अर्थव्यवस्थेला बसत आहे. तसेच, सुएझ कालवा आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील (Strait of Hormuz) असुरक्षिततेमुळे भारताची खत आणि इतर वस्तूंची आयात विस्कळीत झाली आहे।

डिप्लोमॅटिक (राजनयिक) दबाव: भारत रशिया आणि इराणशी संबंध जपताना अमेरिकेशी मैत्रीपूर्ण संबंधही टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. तथापि, आखाती देशांतील (UAE, सौदी अरेबिया) सुमारे 90 लाख ते 1 कोटी भारतीयांच्या सुरक्षिततेचा आणि तिथल्या नोकऱ्यांचा प्रश्न गंभीर बनल्यामुळे, भारताला अमेरिकेला उघडपणे पाठिंबा देणे कठीण जात आहे.

संरक्षण आणि सामरिक धोरण: अमेरिका भारताला एक प्रमुख संरक्षण भागीदार (Major Defense Partner) मानत असली, तरी अशा संघर्षाच्या वेळी भारताला अमेरिकन धोरणांशी सुसंगत राहण्याचा अप्रत्यक्ष दबाव असतो.

थोडक्यात, इराण-अमेरिका संघर्षामुळे भारताला आपल्या ऊर्जा गरजा आणि भू-राजकीय संबंध (Geopolitical relations) यांच्यात समतोल राखण्यासाठी अमेरिकेच्या दबावाला सामोरे जावे लागत आहे.

आखाती युद्धामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर पडणारे संभाव्य दुष्परिणाम अभ्यासल्यानंतर या संशोधनामध्ये सुरूवातीला घेतलेल्या गृहीतकृत्याची तपासणी करणे म्हणजेच सदर गृहीतकृत्य योग्य आहे की अयोग्य आहे हे तपासून बघणे ही या संशोधनाची नंतरची पायरी आहे.

**गृहीतकृत्याची तपासणी:**

या संशोधनासाठी पुढील गृहीतकृत्य घेतले होते.

'आखाती युद्धाचे गंभीर दुष्परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होऊ शकतात व ती विस्कळीत होऊ शकते.'

भारतामध्ये काही दिवसांपासून अमेरिका इसराइल आणि इराणमध्ये आखाती युद्धाला सुरुवात झाली आहे. या युद्धाचे पडसाद भारतीय अर्थव्यवस्थेवर देखील पडायला सुरुवात झाली आहे. घरगुती गॅस सिलेंडर न मिळाल्यामुळे अनेक गृहिणींना तसेच हॉटेल व्यवसायिकांना आणि कॅटरर व्यावसायिकांना आलेले ऑर्डर गॅस सिलेंडर नसल्यामुळे घेता आले नाही. लहान व्यवसायिकांना गॅस सिलेंडरचा मोठा तुटवडा भासत असल्यामुळे काही व्यावसायिकांनी आपले व्यवसाय बंद केले आहेत. तर काही व्यवसायिकांनी आपल्या व्यवसायात तयार केले जाणारे खाद्यपदार्थांच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढवल्या आहेत. ज्याचा सरळ प्रभाव सामान्य माणसाच्या खिशावर पडला आहे.

पेट्रोल व डिझेलच्या वाढत्या किमतीमुळे भविष्यात वाहतूक व दळणवळण व्यवस्था मोठ्या प्रमाणात विस्कळीत होऊ शकते. अर्थशास्त्राच्या नियमानुसार जेव्हा वस्तूच्या किमती वाढतात त्यामागे एक तर इंधनाच्या किमतीत झालेली वाढ हे एक महत्वाचे कारण असू शकते. मात्र दुसरे कारण हे मानवनिर्मित असते. कृत्रिम टंचाई, मालाचा अतिरिक्त केलेला साठा ग्राहकांना मिळू न देणे इत्यादी विपणनास हानिकारक बाबी भविष्यात वाढण्याची दाट शक्यता आहे. वस्तूच्या किमती वाढल्यास सर्वसामान्य लोकांना मोठी काटकसर करावी लागेल. मात्र प्रश्न उभा राहतो तो म्हणजे भारतातील गरीब वर्गाचा. वस्तूंच्या किमती वाढल्यास त्याचा मोठा फटका गरीब वर्गावर होईल. अनेकांचे रोजगार जातील. भ्रष्टाचार, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि बेरोजगारीत मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते.

भारतातील जास्तीत जास्त कच्चा माल आखातातून आयात करावा लागतो. सध्या हा माल थोड्याफार प्रमाणात का होईना भारतीय उद्योजकांना प्राप्त होत आहे. आखाती युद्ध दीर्घकाळ चालले तर मात्र भारतीय उद्योजकांना हा कच्चा माल मिळणार नाही. यामुळे मोठमोठे उद्योग बंद पडू शकतात. आखातातील उद्योगांमध्ये भारतातील कामगार मोठ्या प्रमाणात काम करत आहेत. दीर्घकाळ चाललेल्या युद्धामुळे उद्योगधंदे बंद पडल्यामुळे आखातातील भारतीय कामगारांना भारतात परत येण्याशिवाय दुसरा पर्याय उपलब्ध राहणार नाही. त्यामुळे भारतातील बेकारी मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते.

आखाती युद्धामुळे परकीय गुंतवणूकदार त्यांची गुंतवणूक भारतीय शेअर बाजार मधून भविष्यात पूर्णपणे काढू शकतात. त्याचा विपरीत परिणाम भारतीय शेअर बाजाराच्या निर्देशांकावर होऊ शकतो. सध्या 75,000 च्या जवळपास असलेला भारतीय शेअर बाजाराचा निर्देशांक भविष्यात मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. नामांकित कंपन्यांच्या शेअर्सच्या किमती मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतात. ज्यामुळे सर्वसामान्य लोकांचे मोठे नुकसान होऊ शकते. परिणामतः या सर्वांचे विपरीत परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झाल्यामुळे ती पूर्णपणे विस्कळीत होऊ शकते.

उपरोक्त माहितीवरून या संशोधनामध्ये घेतलेले गृहीतकृत्य सत्य आहे हे सिद्ध होते.

**सारांश :**

अनेक दशकांपासून इराण-इराक-अमेरिका आणि इराण-इसराइल-अमेरिका या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाला आहे. कधी आपल्या देशातील सुरक्षिततेचा अंदाज इतर देशांना व्हावा तर कधी दुसऱ्या देशातील सुरक्षितता मोडकळीस आणावी या

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-3(A)| March-2026

उद्देशाने हा तणाव सतत वाढत आहे. या तणावामुळे 1991 मध्ये सर्वप्रथम आखाती युद्धाला सुरुवात झाली होती. हे युद्ध दीर्घकाळ चालल्यामुळे युद्धात सहभागी असलेल्या सर्वच देशांना मोठ्या प्रमाणात विविध प्रकारच्या नुकसान सहन करावे लागले होते.

28 फेब्रुवारी 2026 या तारखेपासून आखातामध्ये मोठे युद्ध चालू झाले आहे. 1991 प्रमाणे याही आखाती युद्धामध्ये सहभागी झालेल्या सर्वच देशांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक, जैविक आणि नैतिक नुकसान झालेले आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने दुसऱ्या देशातील घडामोडींवर स्थित्यंतरीत होत असते.

जगात घडलेल्या महत्वाच्या घटनांचे पडसाद भारतीय अर्थव्यवस्थेवर सतत पडत राहतात. त्यामुळे या आखाती युद्धाचासुद्धा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला आहे तसेच भविष्यात देखील या युद्धाचे विविध पडसाद भारतीय अर्थव्यवस्थेवर पडणार आहेत हे देखील तितकेच खरे आहे. हे पडसाद अधिक तीव्र असू नयेत यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने स्वतः पुढाकार घेऊन एका समितीची स्थापना करावी. या समितीमध्ये केंद्र सरकारचे काही अर्थतज्ञ आणि राज्य सरकारचे काही अर्थतज्ञ असे समितीचे सदस्य राहतील. आखातातील युद्धाची तीव्रता आणि भारतातील अर्थव्यवस्थेवर या युद्धाचे पडणारे संभाव्य दुष्परिणाम तसेच हे दुष्परिणाम टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना यासंबंधी सूक्ष्म अभ्यास करून या समितीने एका ठराविक वेळेमध्ये आपला अहवाल सरकारकडे द्यावा. सरकार या अहवालाचा व्यवस्थित अभ्यास करेल आणि या समितीने सांगितलेल्या उपाययोजना योग्य आहे असे वाटल्यास त्यांची अंमलबजावणी करेल.

इतर युद्धांप्रमाणेच आखाती युद्ध सुद्धा भारतीय अर्थव्यवस्थेवर तीव्र प्रभाव पाडू शकतात. भारताने सर्वप्रथम लोकांच्या अन्न, वस्त्र व निवारा या गरजा कशा प्रकारे लवकरात लवकर पूर्ण होतील? याकडे आपले लक्ष केंद्रित करावे. शिक्षण, वीज निर्मिती, दवाखाने, स्वच्छ पाणी पुरवठा करणारे विभाग इत्यादी प्राथमिक सुविधा वाढवण्याकडे प्राथमिकता दिली पाहिजे. स्वयंरोजगारासारख्या विविध योजनांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. परिणामतः मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल आणि देशाच्या बेरोजगारीची टक्केवारी सुद्धा मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.

भारताने विदेशातून कच्चामाल खरेदी करण्याकडे आपले लक्ष देण्यापेक्षा भारतातूनच सदर कच्चामाल उपलब्ध होऊ शकतो का? याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. म्हणजे भारताला कच्च्या मालासाठी दुसऱ्या देशांवर अवलंबून राहण्याची आवश्यकता पडणार नाही.

आखाती युद्धाचा फायदा घेऊन अमेरिका आणि मित्रराष्ट्र भारतावर व्यापार विषयक दबाव आणू शकतात. भारताने अमेरिकेकडून आयात केलेल्या वस्तूंवर भविष्यात अमेरिका मोठे कर आकारू शकतात. तसेच भारताकडून अमेरिकेला ज्या वस्तू निर्यात होतात त्या वस्तूंवर मात्र अमेरिका मोठ्या प्रमाणात कर सवलत मागू शकते. हे सर्व करण्यासाठी अमेरिका भारतावर कोणत्या ना कोणत्या प्रकारे दबाव आणू शकते. यासाठी भारतानेदेखील आपले व्यापारासंबंधी करविषयक धोरणात पुन्हा संशोधन करून सदर करा संबंधी योग्य तो बदल करून नवीन कर योजना आखावी. असं केल्यास भारताला अमेरिकेसारख्या मुत्सद्दी राष्ट्राच्या व्यापारासंबंधी आणलेल्या दबावाखाली झुकावे लागणार नाही. असे झाले तर भारतीय अर्थव्यवस्थेला एक नवीन आयाम मिळेल आणि ती स्वयंसिद्ध होईल. परिणामतः दिवंगत राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी भारताला 21 व्या शतकातील महासत्ता म्हणून पाहिलेले स्वप्न खरे ठरू शकते

**संदर्भ ग्रंथ**

1) सामाजिक संशोधन पद्धती : डॉ. प्रकाश देलीवाल, दासगणू प्रकाशन, नागपूर.
2) संशोधन पद्धती : डॉ. प्रदीप आगलावे साईनाथ प्रकाशन, नागपूर
3) Research Methods in multidisciplinary studies : Dr. Vikas Kundu, Dr. J.K. Thakur, Dr. Kaukab Azeem, Arya Book Publication, Haryana.
4) www.google.com
5) www.wikipedia.co.in
6) https://agrowon.esakal.com
7) https://frontline.thehindu.com
8) https://www.loksatta.com